**प्रेसनोट**

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १७/०६/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | श्री अर्जुन शिवशंकरराव पवार, वय ४८ वर्ष, पद – ग्रामपंचायत अधिकारी (वर्ग–३), ग्रामपंचायत कार्यालय वडनेर भुजंग पंचायत समिती अचलपुर जि. अमरावती |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक १७/०६/२०२५ रोजी १७:५० ते १७:५९ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ३०,०००/–रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ३०,०००/–रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/–रुपये |
| ७ | घटनास्थळ | मोती मंगल कार्यालयाजवळ अचलपुर जि. अमरावती |

**थोडक्यात हकिगत** :– यातील तक्रारदार हे सर्वज्ञ मंगलम चे व्यवस्थापक असुन ती जागा अकृषक क्षेत्राची आहे. त्यावर सर्वज्ञ मंगलम नावचे मंगलकार्यालय आहे त्या जागेचे थकित कर रक्कम भरने करीता तक्रारदार यांना राष्ट्रीय लोक अदालत अचलपुर कोर्ट येथे हजर राहण्याबाबत नोटीस प्राप्त झाली. त्या संबंधाने तक्रारदार व त्यांचे भाउ हे संबंधीत कोर्टात हजर होते त्यावेळी श्री अर्जुन पवार (ग्रामसेवक अधिकारी) हे हजर राहले नाही. त्यामुळे थकीत कर रक्कम भरण्यात आली नाही.

त्यानंतर तक्रारदार यांना मंगल कार्यालयाची थकीत कराची रक्कम भरायची असल्याने त्यांनी भावाचे नावे दिनांक १२/०६/२०२५ रोजी सदर थकीत कराच्या बिलाची मागणी बाबतचा अर्ज केला होता. त्या अणुशंगाने तक्रारदार हे स्वत:हा श्री अर्जुन पवार (ग्रामसेवक अधिकारी) यांना भेटले त्यानी तक्रारदाराला म्हटले की, "तुमचे सन २०२० ते २०२५ पावेतो एकुण सहा वर्षाचा ग्रामपंचायत कर अधिक आहे. तरी तुम्ही थकीत रक्कमेपैकी मागील दोन वर्षाचा थकित कर भरा त्याची पावती मी तुम्हाला देतो. परंतु उरलेला चार वर्षाचा थकित कर रक्कम अंदाजे ८०,०००/– रू मी माफ करतो तो तुम्ही भरू नका त्या मोबदल्यात मला ३०,०००/– रू दयावे लागतील" असे म्हटले त्यावेळी नाईलाजाने तक्रारदार यांनी हो म्हणुन तेथुन निघुन गेले.

तक्रारदार यांचे मंगल कार्यालयाचे थकित कर रक्कम माफ करण्यासाठी ३०,०००/– रूपये मागणी करीत असल्याबाबत व तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दि. १६/०६/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली.

नमुद तक्रारीच्या अणुशंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री अर्जुन पवार (ग्रामसेवक अधिकारी) यांनी तक्रारदार यांना ३०,०००/– रू मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे अर्जुन पवार यांनी तक्रारदार यांचे कडुन पंचा समक्ष ३०,०००/– रू लाच रक्कम स्विकारली वरून आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन पो. स्टे. अचलपुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, मा. श्री मंगेश मोहोड पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. स्वप्नील निराळे, तसेच पो.नि. निलीमा सातव, पोलीस अमंलदार राजेश मेटकर, उपेंद्र थोरात, वैभव जायले, आशिष जांभोळे व चालक राजेश बहिरट, गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,टोल फ्रि नंबर–१०६४**

(स्वप्नील निराळे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.
मो.नं. ९५९५३०९०९८